# भारतीय महिलांचे मानवाधिकार

**अश्विनी भाऊरावजी चौधरी**
संशोधक विदयार्थीनी
रा.तु.म.नागपूर जि. नागपूर

---

**प्रस्तावना —**

मानवाधिकराचा अर्थ समजण्यासाठी आधी अधिकार म्हणजे काय हे ध्यानात घेणे आवश्यक आहे. अधिकार म्हणजे आपल्या विकासासाठी आपण केलेल्या मागण्या होय. या मागण्यांना जेव्हा समाजमान्यता मिळते तेव्हा त्यांचे हक्कांत रूपांतर होते. निसर्गानेच स्त्री आणि पुरूषांची निर्मिती केली असली तरी अनादी काळापासून सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि राजकीय क्षेत्रात पुरूषाचे श्रेष्ठतव राहीलेले आहे. स्त्री कोमलता, सहनशीलता त्याग, करूणा, आणि ममता यांचे प्रति आहे. तर पुरूष कठोरता सुध्दता आणि श्रमशीलता इत्यादीचे प्रतीक आहे. भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीला सदैव पुजनीय मानले गेले आहे. ‘‘मातृ देवो भव:’’ असा उदघोष करून स्त्री ही ईश्वरसमान पूजनीय आहे. असा भाव व्यक्त केला जातो. प्राचीन काळापासून स्त्रिया सामाजिक व कौटूबिंक अन्यायाच्या बळी ठरल्या होत्या. पारंपारिक भारतीय समाजात अनेक हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले होत. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात युरोपीय समाजात निर्माण झालेल्या विशिष्ठ परिस्थिती मुळे स्त्रियांना अथजिनासाठी घरा बाहेर पडणे भाग पडले. त्यातुन त्यांना थोडे फार आर्थिक स्वावलंबन लाभले. स्त्रियांच्या स्थितीत बदल होण्यास हा घटक महत्वपूर्ण ठरला.

प्रा. हेरॉल्ड लास्की यांच्या मते ‘‘हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती की ज्या शिवाय कोणत्याही व्यक्तिस स्वत:ची संपूर्ण प्रगती साध्य करता येत नाही.’’ संविधानाने मानवाला दिलेले सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक अधिकार मिळविण्यासाठी योग्य सामाजिक वातावरण असणे अत्यंत आवश्यक आहे. मानवी हक्कांच्या पुरवठयासाठी समाजात सकारात्मक विचार आणि मानवी हक्कांसाठी अनुकूल वातावरण आवश्यक आहे. शक्तिच्या स्वतंत्र आणि प्रतिष्ठेशी संबंधिक अधिकारांना मानवाधिकार म्हणतात. मानवी हक्क हे प्रत्येक व्यक्तीच्या सर्वागिण विकासासाठी अपरिहार्य आहे. मानवी हक्क किंवा इतर कायदेशीर हक्क सुनिश्चित करणे ही सरकारची जबाबदारी आहे. मानवी हक्क हे असे हक्क आहेत जे एखादया व्यक्तिचे जीवन, स्वातंत्र, समानता आणि प्रतिष्ठेशी संबंधित आहेत. या अधिकारांचे भारतीय राज्यघटनेच्या भाग — ३ मध्ये मूलभूत अधिकारांच्या नावाने वर्णन केले आहे. आणि ते न्यायालयाव्दारे लागू करण्यायोग्य आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय कराराचा परिणाम म्हणून संयुक्त राष्ट्राच्या महासभेने स्वीकारलेले, देशाच्या न्यायालयांव्दारे लागू करण्यायोग्य असे अधिकार मानवाधिकार म्हणून गणले जातात. आणि या अधिकारामध्ये प्रदूषण मुक्त वातावरण जगण्याचा अधिकार, अपमानास्पद वागणूक, कोठडीत छळ आणि महिलांना सन्मानाने वागण्याचा अधिकार याचा समावेश होतो. मानवी हक्क हा जगातील सर्व सभ्यता, संस्कृती, जीवनमुल्ये आणि आदर्शाचा आहार आहे. याच भावनेतून आपल्या संविधानात मूलभूत अधिकार आणि धोरणात्मक मार्गदर्शक तत्त्वे देण्यात आली आहे. मानवी हक्कांना काही वेळा मुलभूत हक्क जन्मजात किंवा जन्मजात हक्क, नैसर्गिक किंवा नैसर्गिक हक्क, मुलभूत अधिकार इत्यादी नावांनी संबोधले जाते.

**महिलांचे मानवी हक्क —**

जागतिक स्वरांवर लोकशाही व्यवस्था मजबूत झाल्यामुळे महिलांनाही पुरूषांच्या बरोबरीने आणण्याच्या मोहिमेला वेग आला. कायदा आणि न्यायासमोर समानता, सार्वजनिक सेवांमध्ये नियुक्ती साठी समान संधी विचार स्वातंत्र, अभिव्यक्ति, निवास, रोजगार इत्यादी निर्णय घेण्याच्या प्रत्येक स्तरांवर महिलांना केवळ पुरूषांच्या बरोबरीने आणले गेले नाही, तर आवश्यक तेथे विशेष तरतुदीही केल्या गेल्या त्याच्या निष्ठा आणि सन्मानाचे रक्षण करण्यासाठी महिलांच्या मानवी हक्कामध्ये स्त्रीला माणूस म्हणून असलेल्या अधिकाराचा समावेश होतो. जागतिक स्तरांवर त्यांच्या मान्यतेसाठी स्त्रीला प्रदीर्घ संघर्ष करावा लागला, आणि मग कुठेतरी स्त्रीयांना माणुस म्हणून स्वीकाराले गेले आणि मग हे सर्व हक्क, जे पुरूषांचे क्षेत्र मानले गेले, ते पण मग स्त्रियांनाच मिळाले. भारतात स्त्रियांना हक्क मिळविण्यासाठी अनेक शतके वाट बघावी लागली. वैदिक काळातील स्त्रीला भारतात काही अधिकार असले तरीपण तिला अशा अनेक बाबतीत पुरूषांच्या बरोबरीचे स्थान होते. आणि आपल्याला वैदिक काळातील अनेक स्त्रियांची नावे घेता येतील. ज्यांनी पुरूषांप्रमाणेच क्षिक्षण घेतले आणि आपल्या समाजावर प्रभाव टाकला. मात्र हा कालावधी वगळता भारतीय महिलांच्या हक्कांची नेहमीच पायमल्ली झाली. मानवी हक्कांचा विकास भारतातील एका जटील संघटित प्रक्रियेअंतर्गत झाला आहे. आमची परंपरा, विविध संस्कृतीचे जटील आदर्श आणि तत्त्वज्ञान एकत्रित मानवी हक्क विकसित करण्यासाठी एकत्रित आले आहेत. महिलांना हक्क मिळावेत यासाठी दिर्घकाळ संघर्ष भरतातपण सुरू आहे. शतकानुशतके भारतात पदप्रथा, सतीप्रथा, पुराणमतवाद, हक्कभंग, हुंडा पध्दती हे समाजातील अंग राहीले आहे. भारतीय समाज आणि राजकारणातील पुरूसत्ताक संस्कृती आणि संस्कृतीमुळे महिलांच्या मुलभूत अधिकारांची पायमल्ली होत असल्याने त्यांच्या मानवी हक्कांची स्थिती ही अत्यंत वाईट आहे. महिलांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करणे अशक्य होऊ शकते, चालू असलेल्या गुन्हेगारीमुळे आणि कुटूंबाच्या चार भिंतींच्या आत महिलांना त्यांचे मानवी हक्क मिळण्याची अगोदरच खात्री करणे करजेचे आहे.

**भारतीय महिलांच्या हक्कांविषयी पुढील गोष्टी चिंतेचा विषय आहेत.**

- बलात्कार आणि लैंगिंक अत्याचार
- बालविवाह
- घरगुती हिंसा
- लिंग आधारित भेदभाव/शोषन नाही.
- मुदत पूर्व जन्म, प्री सेक्स निवड आणि निर्मूलन
- महिला आणि कामगार हक्कासाठी समान रोजगार संधी
- कामाची ठिकाणी आणि शैक्षणिक संस्थांमध्ये लैंगिंक छळ
- महिलांचे मालमत्ता आणि वारसा हक्क
- बाल लैंगिक शोषण
- महिला/किशोरवयीन मुलांचे पुनरूपादन आणि लैगिंक आरोग्य अधिकार
- महिलाविरूध्द सन्मान आधारित गुन्हे/ऑनर किलिंग

Volume - 4 (2023)
Special Issue - 2 (April)
**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

- वैवाहिक विवाद, हिरासत, घटस्फोट

भारतातील महिलांच्या घटनात्मक अधिकारांचे दोन प्रकारात वर्गीकरण करता येतो. घटनात्मक अधिकार आणि कायदेशिर अधिकार घटनात्मक अधिकार असे आहेत जे घटनेच्या विविध तरतुदींमध्ये प्रदान केले जातात, आणि दुसरीकडे संसद व राज्य विधानमंडळाच्या विविध कायदयांमध्ये वैधांनिक अधिकार प्रदान केले जातात.

**महिलांसाठी घटनात्मक अधिकार :—**

भारतातील महिलासाठी खालील संवैधानिक अधिकार आणि संरक्षण आहेत.

- राज्य लिंगाच्या आधारावर भारतातील कोणत्याही नागरिकांशी भेदभाव करणार नाही (अनुच्छेद १५(१)१)
- राज्य भारतीय पुरूष आणि महिला दोघांनाही समान कामासाठी समान वेतन सुनिश्चित करते (कलम ३९ (डी))
- महिलांसाठी कोणतीही विशेष तरतूद करण्याचा अधिकार राज्याला आहे. आणि तो राज्य प्रधान राज्य आहे आणि महिलांच्या बाजुने सकारात्मक भेदभाव करण्यास सक्षम आहे. (कलम १५(३)
- पुरूष आणि महिलांसाठी समान प्रमाणत उपजिविकेचे साधन सुनिश्चित करण्यासाठी राज्य काम करते. (कलम ३९(ए))
- प्रत्येक महिलांसाठी नपरपालिकेत निवडणूकीव्दारे भरल्या जाणाऱ्या एकुण जागांपैकी एक तृतीयांश जागा महिलासाठी राखीव असतील. (अनुच्छेद २४३ टी (३))
- महिला कामगारांच्या आरोग्याचा आणि सामर्थ्याचा गैरवापर होणार नाही याची राज्याने काळजी घेणे आवश्यक आहे आणि त्यांना आर्थिक दृष्टया सक्षम केले पाहिजे जेणेकरून त्या त्याचे जीवन सन्मानाने जगु शकतील (अनुच्छेद ३९(ई))
- प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये प्रत्यक्ष निवडणूकीव्दारे भरल्या जाणाऱ्या एकुण जागांपैकी एक तृतीयांश जागा राखीव असेल (कलम २४३ टी (३))
- महिलांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहचवणाऱ्या अपमानास्पद प्रथा नष्ठ करणे हे प्रत्येक भारतीयांचे काम आहे. (कलम ५१—।(म))
- राज्य महिलांना कामाच्या ठिकाणी न्याय आणि मानवीय परिस्थितीची आणि मातृत्व आरामाची खात्री करून देईल. (कलम ४२)

**महिलांचे हक्क सुरक्षित करण्यासाठी कायदे : —**

- **मुस्लिम विवाह कायदा (१९३९)**— हा कायदा मुस्लिम पत्नीचा तिचा विवाह मोडण्याचा अधिकार देतो.
- **महिलांची तस्करी (प्रतिबंध) कायदा (१९५९)** — व्यावसायीक लौगिंक शोषणसाठी प्रतिबंधनासाठी हा कायदा आहे. हे महिला आणि मुलींची तस्करी थांबवते आणि महिलांचे सक्षमीकरण करते. आणि वेश्यावेवसाय थांबवते.
- **समान मोबदला कायदा (१९७६)** — पुरुषांप्रमाणे समान काम किंवा कामाची तरतुद करतो आणि महिला आणि पुरुष या दोघांनापण त्याचा कामाचा मोबदला सारखाच देतो.

- **कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा (२००५)** — हा कायदा भारतातील महिलांना सर्व प्रकारच्या कौटूंबिक हिंसाचारापासून संरक्षण देणारा सर्व समावेशक कायदा आहे. यात त्या महिलांचादेखील समावेश आहे ज्या अत्याचाराला बळी पडतात. आणि कोणत्याही प्रकारच्या शारिरीक, मानसिक, शब्दिक किंवा भावनिक हिंसाचाराचा त्यांना त्रास होतो.
- **हिंदू विवाह कायदा (१९५६)** — विवाह आणि घटस्फोटाच्या संबंधात, भारतीय पुरुष आणि महिलांना समान अधिकार दिले आहेत.
- **हिंदू उत्तराधिकार कायदा (१९५६)** — हा कायदा अगदी मुलीलाही निर्देशित करतो. त्यांच्या आईवडिलांच्या मालमत्तेत त्यांचा मुलाऐवढाच हक्क आहे. मुलगा आणि मुलगी हे दोघेपण समान वारस आहे.
- **मातृत्व लाभ कायदा (१९६१)** — बाळाच्या जन्मापूर्वी आणि नंतर कालावधीसाठी महिलांच्या रोजगारांचे नियमन करतो आणि मातृत्व लाभ आणि इतर फायदे प्रदान करतो.
- **सती प्रथा (प्रतिबंध) कायदा (१९८७)** — हा कायदा सती प्रथा सारख्या वाईट प्रथांना प्रतिबंध प्रदान करतो. आणि स्त्रीयांचे वैभव अधिक प्रभावीपणे मांडण्यांसाठी प्रयत्न करतो.
- **हुंडा बंदी कायदा (१९६१)** — हा कायदा विवाहपूर्वी किंवा नंतर कोणत्याही वेळी महिलांना हुंडा देण्यास किंवा घेण्यास प्रतिबंधित करतो.
- **कामाच्या ठिकाणी महिलांचा लैगिंक छळ (प्रतिबंध आणि निवारण) कायदा (२०१३)** — सर्व कामाच्या ठिकाणी महिलांना लैगिंक छळापासुन संरक्षण प्रदान करते. मग ते संघटित असो किंवा असंघटित, सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही क्षेत्रामध्ये.
- **मुस्लिम महिला (घटस्फोटावरील अधिकारांचे संरक्षण) कायदा (१९८६)** — हा कायदा घटस्फोटीत मुस्लिम महिलांच्या हक्कांचे संरक्षण करतो.
- **कायदेशिर सेवा प्रधिकरण कायदा (१९८७)** — हा कायदा भारतीय महिलांना मोफत कायदेशिर सेवा प्रदान करतो.
- **खाण कायदा (१९५२) आणि कारखाणा कायदा (१९८७)** — हा कायदा सकाळपासून संध्याकाळपर्यत लागू आहे. १७ तासाच्या दरम्यान महिलांच्या रोजगाराचे निर्धारण करते . या कायदयात खाणी आणि कारखान्यामध्ये त्यावेळेच्या सुरक्षितता आणि कल्याणाच्या अधिकाराबाबत सांगीतले आहे.
- **विशेष विवाह कायदा (१९५४)** — या कायदयाव्दारे महिलांना वैवाहिक स्वातंत्र्य तसेच धार्मीक स्वातंत्र्य प्रदान करण्यात आले आहे. या कायदयाव्दारे कोणतीही महिला तिचा धर्म न बदलता ती दुसऱ्या धर्माला मानणाऱ्या व्यक्तिशी लग्न करु शकते.
- **किमान वेतन कायदा (१९४८)** — हा कायदा पुरुष आणि महिला कामगारामधील भेदभाव प्रतिबंधित करतो किंवा महिलांसाठी पुरूषांपेक्षा कमी वेतन मंजुर करत

नाही.

- **भारतीय दंड संहिता (१९८०)** — या कायदयात भारतीय महिलांना हुंडाबळी बलात्कार अपहरण, क्रुरता आणि लैंगिक गुन्हांपासुन संरक्षण करण्यासाठी तरतुदी आहे.

  भारत सरकारकडून महिलांसाठी अनेक विकस कार्यक्रम आणि कल्याणकारी योजनांचे संचालन केले जात आहे. जेणेकरून त्यांचे जीवनमान उंचावेल व विकास कामात त्यांचा जास्तीत जास्त मान उंचावेल व विकास कामात त्यांचा जास्तीत जास्त सहभाग घेता येईल. सरकारच्या महिलांशी संबंधित काहि प्रमुख योजना पुढीलप्रमाणे आहेत.

- किशोरी बालिका योजना (१९९२) — ही गरीब कुटूंबातील मुलीच्या योग्य आरोग्य आणि शिक्षणासाठी आहे.
- राष्ट्रीय मातृत्व लाभ योजना (१९९४) — ही योजना गरीब महिलांना बाळंतपणासाठी मदत पुरवते.
- महिला स्त्री शक्ती योजना (१९९८) — ही बचत गटांव्दारे महिलांना आर्थिक आणि सामाजिक दृष्टया सक्षम करते.
- इंदिरा गांधी योजना (१९९६) — ही ग्रामीण आणि वस्तीतील महिलांना आर्थिक स्वावलंबन प्रदान करते.
- महिला समृध्दी योजना (१९९३) — ही ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी कार्य करते.
- राष्ट्रीय महिला निधी योजना (१९९३) — ही दारीद्रयरेषेखालील कुटुंबातील महिलांसाठी आहे. ही योजना महिलांनमध्ये आर्थिक, सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी ही योजना कर्ज देते.

शासनाकडून महिलांसाठी अनेक विकस कार्यक्रम आणि कल्याणकारी योजना राबवल्या जातात जेणेकरून त्यांचे जीवनमान सुधारता येईल आणि विकास कामांमध्ये त्यांचा जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित करता येईल. केंद्रीय समाज कल्याण मंडळाची स्थापना १९५८ मध्ये झाली आणि प्रत्येक राज्यात मंडळाशी संबंधित संस्था महिलांचे शिक्षण, रोजगार आणि महिला कल्याण वाढविण्यासाठी कार्यरत आहे. १९९९ मध्ये भारतात रष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना झाली. संध्या राज्यांमध्ये राज्य महिला आयोगही स्थापन करण्यात आले आहे.

महिलांच्या हक्कांसाठी भारत सरकारने महिला सक्षमीकरण धोरण (२०००) अंतर्गत दहा वर्षाची योजना सादर केली ज्यामध्ये धोरण आणि निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग, कृषी अद्योग, अर्थ व्यवस्थेतील परिस्थितीचे मुलयांकन, शिक्षण, आरोग्य, पोषण, गृहनिर्माण, पर्यावरण विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या संदर्भात महिलांची स्थिती, महिलांवरील वाढीती हिंसा, मीडीयाची भुमिका यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. महिलांची स्थिती सुधारण्यासाठी १९८५ मध्ये भारत सरकारने महिला आणि बाल विकास विभागाची स्थापना केली आहे. १९९२ मध्ये राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करण्यात आली आणि देशात आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला. २००१ हे वर्ष भारत सरकारने महिला सक्षमीकरण वर्ष

म्हणून घोषित केले.

भारतीय राज्यघटनेत म्हणायचे तर स्त्रीला पुरेषांच्या बरोबरीचे स्थान आहे, पण वास्तव आजही दिसून येते की, लग्न , काम , संपत्तीचे अधिकार यासारखे कोणतेही क्षेत्र नाही आहे ज्यामध्ये महिलांनवर हिंसाच केली आहे.

महिलांवरील हिंसाचार हि जागतिक घटना आहे. ज्यापासून कोणताही समाज आणि समुदाय मुक्त नाही. महिलांवरील भेदभाव अस्तित्वात आहे कारण त्याचे मुळ सामाजिक नियम आणि मुल्यांमध्ये आहे. महिलांवरील प्रत्येक ठिकाणी आणि प्रत्येक प्रकाराच्या हिंसाचारासाठी समाज आणि राज्य या दोघांनाही त्यांची नैतिक आणि कायदेशिर जबाबदारी पार पाडावी लागेल. संपूर्ण समाजाची स्त्रियांबद्दलची विचार सरणी बदलून टाकणारा असा सामाजिक उपक्रम असावा अशी व्यावहारिक स्वरूपाची मागणी आहे.

**निष्कर्ष —**

महिलांना दिलेले अधिकार आणि त्यांच्यासाठी केलेल्या कायदयातही महिलांची अवस्था दयनीय आहे. महिलांवरील अत्याचार थांबवण्यासाठी पुरेसा कायदा हा कमी पडत आहे. यामुळे महिलांची स्थितीत सुधारणा होत नाही आहे. स्वातंत्र्यापासुन आजपर्यंत विविध कायदयांनी जसे की विवाह कायदा, विशेष विवाह कायदा, विवाह किंवा घटस्पोटाचे विघटन कायदा, गर्भपाताला मान्यता, असे अनेक कायदे आहेत कि यामुळे महिलांच्या सामाजिक स्थितीत फरक पडला आहे. आणि यातच काही उणिवामुळे महिला या कायदयांचा लाभ घेऊ शकत नाही.

संपूर्ण देशातील महिलांवरील गुन्हांचे विश्लेषन केल्यास हे स्पष्ट होते की, बहुतांश घटनांचे अहवालच दाखल होत नाही, मग ते कौटूंबिक दबावामुळे किंवा सामाजिक दबावामुळे असेल अनेक घटना कुटूंबाच्या चार भिंतीत बंदिस्त राहातात.

महिलांच्या उन्नतीसाठी आणि संरक्षणासाठी अनेक कायदे आहेत. परंतु लोकांना विशेषत: महिलांना कायदे आणि अधिकाराचे पुरेसे ज्ञान नाही. त्यामुळे अशा कायदयाची पुरेशी प्रसिध्दी किंवा माहिती महिलांना वेळोवळी देण्यात यावी.

कौटूबिंक हिंसाचाराच्या बाबतील महिला या पुढे येत नाही, पिडीत महिलांना आवाज असेल तर ते समाजात योग्य मांडले जात नाही. कायदा आणि सरकार सोबतच समाजानेही आपली भुमिका बजावली पाहीजे.

देशातील एकुण मतदारांपैकी निम्मे मतदारांपैकी या महिला आहे. पण असे असतानाही लोकसभा राज्य विधीमंडळातील प्रतिनिधीत्व अत्यंत निराशाजनक आहे. राजकारणातही महिलांना पुढे येऊन सहभाग घेतला पाहीजे.

महिलांना लाकशाही संस्थांमध्ये स्वत:चे असे प्रतिनिधित्व करता येत नाही. विकसित देशातील लोकशाही संस्थांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व त्यांच्या संस्थेचा प्रमाणात नाही.

महिलांमध्ये साक्षरतेचे प्रमाण देखिल खुप कमी आहे. शिक्षणाचा अभाव देखील महिलांवरील अत्याचारांचे कारण आहे.

महिलांची स्थिती सुधारण्यासाठी स्वयंसेवी संस्था अधिक प्रभावी भुमिका बजावू शकतात. अत्याचारित महिलांना शासकीय व निमसरकारी संस्थांकडून पुरेसा सुविधा देण्यात याव्यात तसेच महिलांसाठी स्वयंरोजगार योजना इत्यादींना पुरेसे महत्त्व देण्यात यावे.

**संदर्भ ग्रंथ सुची —**


- आशा कौशिक : मानवधिकार और राज्य : बदलते संदर्भ, पोइन्टर पाब्लिशर्स, जयपूर, २००४
- देवरे जयश्री : महिला सक्षमीरकण आणि शासकीय योजना
- चतूर्वेदी अरूण एवं लोढा संजय, भारत मे मानवाधि कार , जयपूर, पंचशील प्रकाशन,२००५
- दीक्षीत सोना /दीक्षित अरूण कुमार, महिलाओं के मानवाधिकारो का संरक्षण, कुरूक्षेत्र, कुरूक्षेत्र प्रकाशन, २००५
- प्रिया तिवारी, रवनतदंस वि ।बींतलं छंतमदकतं क्मअ त्मेमतबी पदेजपजनजम
- महावर रंजना, पदजमतदंजपवदंस श्रवनतदंस वि मकनबंजपवदए उवकमतद उंदंहमउमदज ।चतपस. श्रनदम २०२१
- पाटील संतोष संभाजी, मानवाधिकार, चनदम त्मेमंतबी चमचंत
- देशमुख बी. टी — भारतीय संबिधान पिंपळापुरे अॅड. क. पब्लिशर्स नागपूर.
- पवार प्रमोद, भारतीय संविधान व शासन, प्रशांत पब्लीकेशन जळगाव,
- पाटील महेंद्र — भारतीय संविधानाची ओळख अर्थव पब्लिकेशन, जळगाव.